जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १००३ दिनांक १८/०६/२०२०**

**युनिट १, गुन्हे शाखेची कारवाई - लॉक डाऊनच्या काळात कंटेमेंट झोनमध्ये सर्रासपणे गुटखा विक्री करणारे दोघेजण जेरबंद व एक लाखाचा मुद्देमाल हस्तगत**

दिनांक १६/६/२०२० रोजी युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी हे युनिट १ चे हद्दीत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होत असल्याने त्याला प्रतिबंध करणेकामी पेट्रोलींग फिरत असतांना पो.ना. सचिन जाधव यांना त्यांचे बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, सादीक शेख व त्याचा भाऊ ऐयतेशाम शेख रा. कासेवाडी, भवानीपेठ, पुणे हे दोघे मिळून त्याचे रहाते घरात कासेवाडी भवानी पेठ पुणे येथे गुटखा, सिगारेट व तंबाखूची चोरून विक्री करीत आहेत.

अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने युनिट १, गुन्हे शाखेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी माहितीची शहानिशा करून खडक पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी मदतीस घेवून, कासेवाडी, राजीव गांधी कॉम्पलेक्स समोर छापा टाकला व आरोपी नामे १) सादीक मेहमुद शेख, वय २८ वर्षे, रा. ३११, कासेवाडी, भवानी पेठ पुणे २) ऐयतेशाम निजामुद्दीन शेख, वय १८ वर्षे, रा. ३११, कासेवाडी, भवानी पेठ पुणे यांना ताब्यात घेतले. व अन्न व औषध प्रशासन, पुणे विभागाकडील अधिकारी श्री आर.बी. कुलकर्णी यांना पाचारण करून त्यांचे ताब्यातून प्रतिबंधीत असलेला अन्न पदार्थ, राजनिवास सेंटेड पान मसाला, आरएमडी प्रिमीयम पान मसाला, हिरा पान मसाला, जाफरानी जर्दा, गोवा १००० गुटखा, गोवा १००० पान मसाला, पी-७ जर्दा ,केसरयुक्त विमल पान मसाला, व्हि-१ तंबाखु व सिगारेट **एकुण रु. १,०७,३१४/- चा माल** जप्त करण्यात आला आहे. त्यांचे विरुध्द खडक पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६७२/२०२० व ६७३/२०२० भादविक. २७२, २७३, ३२८,३४ व अन्न व सुरक्षा मानदे कायदा २००६ चे कलम २६(२) (i), २६(2) (iv) सह वाचन कलम ३ (i) (zz), ५९ व कोटपा केस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांना मा. न्यायालयात हजर केले असता, त्यांना न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंह, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री शिवाजी पवार, गुन्हे प्रतिबंधक, यांचे मार्गदशनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, पोलीस कर्मचारी सचिन जाधव, प्रकाश लोखंडे, इम्रान शेख, इरफान मोमीन, सुभाष पिंगळे, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, तुषार माळवदकर, यांनी केली आहे.